

# राष्ट्रीय सेवा योजना
# विशेष हिवाळी शिबीर














## मढी

## २०१८-२०१९

दादापाटील राजळे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
आदिनाथनगर, ता. पाथर्डी, जि.अहमदनगर (८-२०)
सन २०१८-२०१९

# राष्ट्रीय सेवा योजना

## *विशेष शिबीर*

## अहवाल

## श्री क्षेत्र मढी

दादापाटील राजळे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अदिनाथनगर, ता. पाथर्डी व हरिहरेश्वर महाविद्यालय, कोरडगाव ता. पाथर्डी यांचा संयुक्त राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर मंगळवार दि. १८/१२/२०१८ ते सोमवार दि. २४/१२/२०१८ या कालावधीत श्री क्षेत्र मढी या ठिकाणी यशस्वीपणे संपन्न झाले. या शिबीराचे उद्घाटन मा. श्री. राहुलदादा राजळे, विश्वस्त दादापाटील राजळे शिक्षण संस्था यांच्या हस्ते व मा श्री. सुधीर मरकड, सचिव, श्री. क्षेत्र मढी देवस्थान ट्रंस्ट यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झाले. या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतानां मा. श्री. राहुलदादा राजळे म्हणाले, पर्जन्याच्या अनियमिततेमुळे पाणी प्रश्न भविष्यात गंभीर स्वरुप धारण करत आहे. राष्ट्रीय सेवा योजना माध्यमातुन विद्यार्थ्यांनी जलसंधारण, पर्यावरण संवर्धना बरोबरच शाश्वत आर्थिक विकासासाठी जनजागृती करावी. पाणी प्रश्नाकडे गांर्भीयाने पाहण्याची गरज आहे. असे म्हणाले. त्याच बरोबर वाचन संस्कृती वाढविणे आवश्यक आहे. त्यातून ज्ञानप्रसारण होवून सामाजिक व आर्थिक समस्या सोडविण्यास मदत होईल. असे मार्गदर्शन स्वंयसेवकांना केले. याप्रंसगी स्वंयसेवकांना मार्गदर्शन करताना मा.श्री. पाडूरंग खेडकर सर विश्वस्त, वृ.स.सा.का.लि. आदिनाथनगर म्हणाले की, महात्मा गांधीजीचे ग्रामीण विकासाबद्दल चे विचार स्वंयसेवकांच्या अंगी रूजवणे गरजेचे आहे. हिंदु संस्कृती मधिल ज्ञान, विज्ञान महत्वाचे आहे. त्यांनी सांगितले की राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीरहे बिन भिंतीची शाळा आहे. गावातील संस्कृती, समाजरचना, विचार याचे ज्ञान आवगत करावे. व आद्ययावत आधुनिक ज्ञानाची ग्रामस्थांशी देवाण घेवाण करुन समाज्याच्या सक्षमीकराणासाठी मदत करावी असे मार्गदर्शन केले. या प्रसंगी मा. श्री. उध्दवराव वाघ

संचालक वृ.स.सा.का.लि. आदिनाथनगर म्हणाले की शिबीरातून विद्यार्थ्यामध्ये श्रम संस्कार रुजावेत. मा. श्री. सुधीर मरकड, सचिव, श्री. क्षेत्र मढी देवस्थान ट्रस्ट यांनी आपल्या अध्यक्षिय मनोगतात राष्ट्रीय सेवा योजना शिबीर हे एक निस्वार्थी सेवेची संधी आहे. त्यानी विद्यार्थ्यांना श्रमदाना बरोबरच गावाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, औषधी वनस्पती सर्वेक्षण करावे असे आव्हान केले. या कायक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जे. टेमकर यांनी केले. आभार हरिहरेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्षिरसागर यांनी मानले. तर सुत्रसंचालन स्वयंसेवक कु. सुवर्णा वांढेकर हिने केले. दुपारच्या सत्रात स्वयंसेवकांचे गट करुन पुढील कामाचे दिवसांच्या कामाचे नियोजन केले. शिबीर परिसर स्वच्छ केला.

दुसऱ्या दिवशी सकाळी प्रार्थना, एन एस एस गीत झाल्यानंतर कामास सुरुवात केली. सर्व कानिफनाथ मंदीर परिसर स्वच्छता केली. दुपारच्या सत्रात डॉ. श्रीधर देशमुख यांनी युवकांचे राष्ट्र बांधणीतील योगदान याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आयुष्य, विद्या, यश, बल त्यांनाच प्राप्त होते जे आई वडिलांची सेवा करतात असे सांगितले.

दि. २० डिसेंबर २०१८ गुरुवार शिबीराचा तिसरा दिवस स्वयंसेवाकांनी कानिफनाथ मंदीर परिसरातील बगीचा स्वच्छ केला. दुपारच्या सत्रात प्रा. राजु सुरवसे हास्य सम्राट झी टिव्ही यांनी स्वयंसेवेकांना हसत खेळत निरोगी जीवन याविषावर व्याख्यान झाले. त्यांनी हास्य म्हणजे निरोगी जीवनाचा मंत्र असा संदेश स्वयंसेवकांना दिला.

चौथ्या दिवशी स्वयंसेवकांनी मायंबा डोंगरात जाऊन विविध औषधी वनस्पतीची माहिती घेतली व विविध प्रकारच्या गारगोटी श्री कानीफनाथ देवस्थानसाठी गोळा करुन आणल्या व ॐ चैतन्य कानिफनाथाय नम: असे नाव काढले. दुपारच्या सत्रात प्रा. सुनिल पानखडे डॉ. अण्णासाहेब कृषी तंत्र निकेतन यांनी कृषी क्षेत्रातील युवकांची भुमीका या विषयावर स्वयंसेवकांशी संवाद साधला. त्यांनी शेती क्षेत्रात युवकांना असलेल्या विविध संधी, आधुनिक, तंत्रज्ञानयुक्त शेती या विषयी मार्गदर्शन केले.

दि. २२/१२/२०१८ शनिवार शिबीराचा पाचवा दिवस, गावातील प्राचीन बारव स्वच्छ केला यावेळी गावकऱ्यांनी बारवे विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. पुर्वी याच बारवे मधुन सर्व गावास पाणी पुरवठा होत होता. त्याच सोबत ग्राम स्वच्छता स्वयंसेवकांनी केली.

शिबीराच्या सहाव्या दिवशी स्वयंसेवकांनी श्री कानीफनाथ देवस्थान परिसरात वृक्षरोपनासाठी खड्डे घेऊन वृक्षारोपन केले व गावातील मंदीराचा परिसर स्वच्छ केला. श्रमदानाच्या कामा बरोबरच विद्यार्थ्यानी मिळालेल्या वेळेत गावातील कुटुंबाचे सर्वेक्षण केले. मुलानी कुटुंबाशी संवाद साधला त्यामुळे त्यांना त्यांच्या समस्या कळाल्या. गावची संस्कृती विषयी माहिती घेतली. त्याच बरोबर Don’t Drink and Drive या विषयावर पथनाट्य सादर करुन गावकऱ्यांचे प्रबोधन केले. दुपारच्या सत्रात डॉ. सुभाष भगवान देशमुख यांनी नाथ संप्रदाय : सामाजिक समता या विषयावर बैध्दिक सत्रात स्वयंससेवकांना मार्गदर्शन केले.

दि. २४ डिसेंबर २०१८ शिबीराचा शेवटचा दिवस या दिवशी स्वयंसेवकांनी ग्रामस्वछता केली. जागर स्वच्छतेचा हे पथनाट्य सादर केले. याच दिवशी शिबीराचा समारोप समारंभ पार पडला.

शिबीराचा समारोप मा. श्री. शिवाजीराव राजळे, अध्यक्ष, महाविद्यालय विकास समिती यांच्या प्रमुख उपस्थितीत व मा. श्री. अण्णासाहेब मरकड अण्णासाहेब मरकड, अध्यक्ष श्री. कानिफनाथ देवस्थान ट्रस्ट, मढी यांच्या अध्यक्षेतेखाली पार पडला. मा. श्री. शिवाजीराव राजळे यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना म्हटले की, जगातील सर्वात मोठी युवा शक्ती भारतातअसून युवाशक्तीच्या आधारे विकासात्मक परिवर्तन शक्य आहे. राष्ट्रीय सेवा योजनाच्या माध्यमातून युवकांमध्ये श्रमप्रतिष्ठा, वैज्ञानिक दृष्टीकोन, नेतृत्वगुण, संघभावना, सामाजिक बांधिलकी, देशभक्ती याचे संस्कार होतात. अशा संस्कारित युवा पिढीच्या आधारवरच आपणाला समर्थ भारत घडविता येईल. त्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनाच्या माध्यमातुन देशाच्या लोकसंख्येच्या ६५% पेक्षा जास्त असलेल्या युवकांना सक्षम करणे व त्याच्यात नागरी व सामाजिक जाणिवा जागरुक करणे, त्यांच्यामध्ये शिस्त रुजवणे गरजेचे आहे. त्यांनी चीन, ऑस्ट्रेलिया, युरोपीय राष्ट्राचे दाखले देत समर्थ भारत बनविण्यासाठी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

या प्रसंगी मा. श्री. सुधीर गायकवाड, बॅक ऑफ इंडिया यांनी स्वयंसेवकांना स्पर्धा परिक्षा या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच मा. श्री. श्रीकांत मिसाळ, यांनी स्वत: राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक असतानाचे अनुभव सांगितले मा. श्री. रामकिसन काकडे, संचालक वृ.स.सा.का.लि.आदिनाथनगर यांनी आपले मत व्यक्त केले. स्वयंसेवक कु स्वाती काळे, कु. सुवर्णा भानगुडे, सोमनाथ मुखेकर यांनी आपले शिबीरातील अनुभव सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जे. टेमकर यांनी केले तर

शिबीराचा अहवाल कुञ प्रियंका ताठे या विद्यार्थीनींने मांडला. आभार प्रा. शरद घनवट यांनी आभार मांडले तर सूत्र संचालन स्वयंसेवक कु. सुवर्णा ताठे हिने केले

या सात दिवशीय शिबीराचे यशस्वी संयोजन कार्यक्रम आधिकारी आसाराम देसाई, डॉ. साधना म्हस्के, डॉ. संजय भराटे, प्रा. अस्लम शेख, प्रा. जयश्री दरंदले, प्रा. शरद घनवट यांनी केले.

Video Link:- www.youtube.com/watch?v=vjgAfD५F७d८&t=२२६s

| | |
|---|---|
| प्रा. ए. एच देसाई<br>डॉ. एस. डी. म्हस्के<br>कार्यक्रम अधिकारी | डॉ. आर. जे. टेमकर<br>प्राचार्य |

# मढी येथे सक्षम युवा शिबिराचे आयोजन

**पुण्यनगरी वृत्तसंस्था / करंजी :**

सावित्रीफाई फुले, पुणे विद्यापीठ, दादापाटील राजळे महाविद्यालय, आदिनाथनगर व श्री हरेहरेश्वर महाविद्यालय, कोरडगाव राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मढी ता. पाथर्डी येथे समर्थ भारत अभियान व सक्षम युवा या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष शिबिराचे उद्घाटन जि. प. परिषद सदस्य राहुल राजळे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी स्व. दादापाटील राजळे व स्व. राजीव राजळे यांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले.



अध्यक्षस्थानी मढी देवस्थानचे सचिव सुधीर मरकड होते. दि.१८ ते २४ डिसेंबरपर्यंत हे शिबीर चालणार आहे. या शिबिरामध्ये गटचर्चा, ग्रामस्वच्छता, पर्यावरण, विकास, श्रमदान, कृषी तंत्रज्ञान या विषयावर मार्गदर्शन आणि आणि जनजागृती होणार आहे. या कार्यक्रमासाठी आसाराम देसाई, शरद घनवट, साधना म्हस्के, संजय भराटे, अस्लम शेख, अर्चना दरंदले, अनंत मरकड यांचे विशेष सहकार्य लाभले. या वेळी प्रमुख मांन्यवर म्हणून मढी देवस्थानचे अध्यक्ष अणासाहेब मरकड, वृध्देश्रर साखर कारखान्याचे ज्येष्ठ संचालक उध्दवराव वाघ, सुभाषराव बुधवंत, माजी सरपंच देविदास मरकड, उपसरपंच रवींद्र आरोळे, ग्रामसेवक प्रमोद म्हस्के आदी उपस्थित होते. प्रास्ताविक दादापाटील राजळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजधर टेमकर यांनी केले. हरेहरेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य सुनील क्षीरसागर यांनी आभार मानले.

लोकमत
बुधवार, दि. २६ डिसेंबर २०१८

# महाविद्यालयीन शिबिरातून व्यक्तिमत्त्वाची जडणघडण

## अण्णासाहेब मरकड : राजळे, हरिहरेश्वर महाविद्यालयाचे श्रमसंस्कार शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

तिसगाव : राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून निस्वार्थ वृत्तीचे जागरण होते. महाविद्यालयीन शिबिरातूनच चौरस व्यक्तिमत्वाची खऱ्या अर्थाने जडणघडण होते, असे प्रतिपादन कानिफनाथ देवस्थानचे अध्यक्ष अण्णासाहेब मरकड यांनी केले.

श्रीक्षेत्र मढी (ता.पाथर्डी) येथे दादा पाटील राजळे महाविद्यालय व हरिहरेश्वर महविद्यालयाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. देवस्थानचे सचिव सुधीर मरकड अध्यक्षस्थानी होते. जिल्हा परिषद सदस्य राहुल राजळे, वृद्धेश्वरचे ज्येष्ठ संचालक उद्धवराव वाघ, पांडुरंग खेडकर, सुभाष बुधवंत, प्राचार्य सुनील क्षीरसागर, विश्वस्त शिवाजी मरकड आदी मान्यवर उपस्थित होते.

मरकड म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजना शिबिर ही एक बिनभिंतीची शाळा आहे. आपल्याकडील अद्ययावत ज्ञान व ग्रामसर्वेक्षण, श्रमदानाचे अनुभव यांचा ग्रामस्थांशी संवाद व्हावा. त्याचबरोबर जुन्याजाणत्यांचे अनुभवी बोलही स्मरणात हवेत. विद्यार्थ्यांनी श्रमदानासोबत ग्रामसर्वेक्षण करून ऐतिहासिक पार्श्वभूमिचा मागोवा व दुर्मिळ वनौषधींची माहिती शिबिर कालावधीत आत्मसात केली पाहिजे.

डॉ. राजधर टेमकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. आसाराम देसाई यांनी आभार मानले. विक्रम राजळे, साधना म्हस्के, अस्लम शेख, संजय भराटे, जयश्री दरंदले, शरद घनवट आदी उपस्थित होते.






राष्ट्रीय सेवा योजना
विशेष शिबीर
समर्थ भारत अभियान
सक्षम युवा समर्थ भारत





